



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक १४४ * नांदेड * रविवार, दि. ३१ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# मराठा आरक्षणासाठी रणरणत्या उन्हात मनोज जरांगे यांच्या उपोषणाला सुरूवात

## सरकारने सादर केला १२ मुद्यांचा मसुदा

## विखेंची उपोषण स्थगित करण्याची विनंती



### ...तर मराठा समाजाचा उद्रेक होईल –छत्रपती शाहू महाराज

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अखेर आमरण उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. रणरणत्या उन्हात मनोज जरांगे पाटील हे उपोषणाला बसले आहेत. जरांगे यांनी आर या पारची लढाई सुरू केल्याने सरकारचं टेन्शन वाढलं आहे. मनोज जरांगे यांची सरकारने मनधरणी सुरू केली आहे. तर, दुसरीकडे मराठा आंदोलक आक्रमक झाले असून त्यांनी जालन्यात समृद्धी महामार्ग रोखला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर खासदार छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिक्रिया आली आहे. सरकारने प्रकरण गंभीरपणे नाही घेतलं तर मराठा समाजाचा उद्रेक होईल, असा इशाराच छत्रपती शाहू महाराज यांनी दिला आहे.

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवार, दि. ३० मेपासून पुन्हा रणरणत्या उन्हात उपोषण सुरू केले आहे. यावेळी त्यांच्यासोबत इतर अनेकजण शेतशिवारात उपोषणास बसले आहेत.

मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागणीसाठी पुन्हा मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या उपोषणाने सरकारची धांदल उडाली आहे. त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी सरकारने एक विशेष १२ मुद्यांचा मसुदा तयार करून त्यांच्याकडे सुपूर्द केला आहे. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित करावे अशी विनंती केली.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील म्हणाले की, सरकारने न्याय देण्याच्या भूमिकेत यावे. एकदा याच ठिकाणी आम्ही आमच्या आई–बहिणींना रक्ताच्या थारोळ्यात पाहिलं आहे. पुन्हा असा विचार करु नका. पोलीस लाठीचार्जच्या भानगडीत पडू नका. राज्यात तुम्हाला जड जाईल. मी आडवं बोलत नाही, सरकारला पट्ट्यावर घेत नाही आणि पुन्हा आंदोलन थांबणार नाही, असं इशारा मनोज जरांगेंनी सरकारला दिला. संवाद करून गोडी गुलाबीने मार्ग काढा. हल्ला करायचा नाही, मराठा शांत आहे. सरकार आता दुसऱ्या वेळी हल्ला करणार नाही. तरीही मी बोलून दाखवले, असं मनोज जरांगे म्हणाले.

# राज्य सरकारकडून १२ लाख ७६ हजार कुणबी प्रमाणपत्र वाटप केल्याचा दावा

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा नेते मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्य सरकारने १२ लाख मराठा कुणबी प्रमाणपत्र दिले आहे. आणखी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू असताना मध्येच आमरण उपोषण कशासाठी असा प्रश्न सरकारमधील नेत्यांकडून केला जात आहे.

राज्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात यावे यासाठी आमरण उपोषणाला बसणारे मनोज जरांगे यांना सरकारने आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा एक अहवाल सादर केला. सरकारने सात सप्टेंबर २०२३ रोजी निवृत्त न्यायमूर्ती संदिप शिंदे यांची समिती स्थापन केल्यानंतर सरकारने राज्यातील १२ लाख ७६ हजार ४५३ मराठयांना कुणबी प्रमाणपत्र वाटप केले आहे. यात मराठवाडयातील २ लाख ९४ हजार ९ मराठयांचा समावेश आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण करु नये, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटी येथे पाठविले. निवृत्त न्यायमूर्ती संदिप शिंदे यांची समिती स्थापन झाल्यानंतर मार्च २०२६ अखेर पर्यंत १२ लाख मराठयांना कुणबी प्रमाणपत्र दिली गेली आहेत. ही प्रक्रिया निरंतर सुरु असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

जात पडताळणीसाठी एकूण १६ हजार ६९६ अर्ज आले होते. त्यातील १३ हजार ४२८ जणांना जात प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. केवळ ४३ जणांचे प्रमाणपत्र नाकारण्यात आले. मराठा आंदोलनात एकूण ९६५ जणांवर गुन्हे दाखल झाले असून ८३० जणांवरील गुन्हे मागे घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. ६४ जणांवरील गुन्हे कोणत्याही स्थितीत मागे घेतले जाणार नाहीत असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या आंदोलनकांनी शासकीय संपत्तीचे नुकसान केलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावरील गुन्हे मागे घेतले जाणार नाहीत अशी सरकारची भूमिका असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले. आंदोलनातील २७५ कुटुंबांना अर्थसहाय्य देण्यात आले असून ३१ प्रलंबित प्रकरणे आहेत. मराठा समाजाच्या आंदोलनात आतापर्यंत ३०६ जणांचा मृत्यू झाला आहे. सरकारच्या वतीने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जरांगे यांनी केलेल्या योग्य त्या सर्व मागण्या टप्याटप्याने सरकार सोडवित असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

## जनगणनेच्या कामास नकार देणाऱ्या ३ शिक्षकांवर गुन्हा

**पुणे (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय जनगणना २०२७ च्या अत्यंत महत्त्वाच्या आणि घटनात्मकदृष्ट्या अनिवार्य असलेल्या शासकीय कामाला जाणीवपूर्वक नकार देणे दौंड तालुक्यातील तीन शिक्षकांना भलतेच महागात पडले आहे. राष्ट्रीय कामात गंभीर कसुरी केल्याप्रकरणी या तिन्ही शिक्षकांवर यवत पोलीस ठाण्यात थेट गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे राज्यात शैक्षणिक आणि शासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळणार, नांदेडसह २३ जिल्ह्यांना अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात मान्सूनपूर्व पावसाची सक्रियता वाढत असून हवामान विभागाने ३१ मे रोजी राज्यातील विविध विभागांसाठी हवामानाचा अंदाज दर्शवला आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच मराठवाड्यातील नांदेडसह ६ जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातील ४ जिल्हे, पश्चिम महाराष्ट्रातील २ जिल्हे आणि कोकणातील काही भागांसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ६ जिल्ह्यांसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

कोकण विभागातील ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या ४ जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक या जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

विदर्भ विभागात पावसाचा जोर अधिक राहण्याचा अंदाज असल्याने अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या ११ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये मुसळधार पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी वेगाने वाहणारे वारे यांची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली आणि सोलापूर जिल्ह्याला पावसासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये बदलत्या हवामानामुळे तापमानात घट होण्याची शक्यता आहे.

# विषारी दारूमुळे २२ जणांचा जीव गेला, उत्पादन शुल्क विभागाचे १३ अधिकारी जागेवरच निलंबित

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यात हडपसर आणि फुगेवाडी भागात विषारी दारू पिऊन आतापर्यंत तब्बल २२ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये उरुळी कांचन, दापोडी, फुगेवाडी आणि हडपसर येथील नागरिकांचा समावेश आहे. दारूची नशा वाढवण्यासाठी त्यात 'मिथेनॉल' हे घातक रसायन मिसळल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह ८ जणांना अटक केली असून अवैध हातभट्टी विक्रेत्यांवर धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. याच प्रकरणाला जबाबदार धरून उत्पादन शुल्क विभागाने १३ अधिकाऱ्यांवर कारवाई करीत त्यांचे निलंबन केले आहे.

पुणे शहर व लगतच्या परिसरात विषारी हातभट्टी दारुच्या सेवनामूळे १२ इसमांचा मृत्यू झालेला आहे. तसेच काही इसम रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल आहेत. त्यांच्यावर उपचार चालू आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. ज्या ज्या ठिकाणी विषारी गावठी दारुचा साठा आणि विक्री झाल्याचे आढळून आले, त्या त्या ठिकाणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटक / पथक प्रमुख या नात्याने त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांचा सुयोग्य वापर करुन तसेच कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचा निर्यामतपणे आढावा घेऊन कार्यक्षेत्रातील अवैध व्यवसायात सामील संबंधित इसमांवर कठोर अशी कारवाई करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही.

तसेच अवैध धंद्यात सामील असलेल्या इसमांवर गुन्हे सुध्दा नोंदविलेले नाहीत. तसेच सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई सुध्दा केलेली नाही. जर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सराईत गुन्हेगारांवर वेळोवेळी सक्त व कठोर कारवाई केली असती, तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रात सातत्याने गस्त घातली असती, अवैध धंदेवाल्यांची माहिती गोळा करुन वेळीच कारवाई केली असतो, तर अशी दुर्घटना टळली असती. संबंधित विभागाच्या भरारी पथकातील आणि कार्यकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त राजेश देशमुख यांनी सांगितले.

# संरक्षण क्षेत्रात भारताची ऐतिहासिक झेप! व्हिएतनाम भारताकडून खरेदी करणार ब्रह्मोस क्षेपणास्त्र

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सर्वाधिक शस्त्रांची आयात करणारा देश म्हणून आधी भारताकडे पाहिलं जायचं. पण आता हे चित्र काही प्रमाणात बदलत असल्याचं दिसत आहे. भारताने विकसित केलेल्या शस्त्रांची निर्यात भारत वाढवत असल्याचं दिसून येत आहे. आता व्हिएतनाम भारताकडून ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करणार आहे. भारताकडून व्हिएतनाम ब्रह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

दरम्यान, भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या या ब्रह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी व्हिएतनाम या देशाने भारताबरोबर करार केल्याचं शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तसेच इंडोनेशियाबरोबर देखील ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या कराराबाबतच्या चर्चा अंतिम टप्प्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांच्या पुरवठ्यासाठी भारताने व्हिएतनाम बरोबर करार केला आहे. या बरोबरच इंडोनेशिया बरोबरही अशाच प्रकारच्या करारासाठीच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती देशाचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी शनिवारी दिली आहे.

दरम्यान, व्हिएतनाम आणि इंडोनेशिया बरोबरच्या या करारांचा आर्थिक तपशील अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेला नाही. मात्र, प्रशिक्षण आणि लॉजिस्टिकल सपोर्टसह व्हिएतनाम बरोबरचा करार सुमारे ६० अब्ज रुपये (६२९ दशलक्ष डॉलर्स) किंमतीपर्यंतचा असू शकतो असे सांगण्यात आले होते.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा नांदेडमध्ये 'जनसंवाद'

## अनेकांनी मांडले गाऱ्हाणे



**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस – नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलीसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उपमहानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.


परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. चालू महिन्यात, लातूर, हिंगोली व परभणी या जिल्ह्यांतील नागरिकांनी या उपक्रमाचे माध्यमातून, मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलिस उप महानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या.

दि. ३० मे रोजी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण ३७ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय, इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, इतर उपस्थितांनी पोलीसांच्या कामकाजाबाबत अधिक अपेक्षा व्यक्त केल्या.

सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या तक्रारी शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे हजर होते.







# री-नीट यशस्वी भव्‌!

ललित

एनटीएच्या गलथान कारभारामुळे आणि शिक्षणासारख्या अत्यंत पवित्र क्षेत्रात शिरलेल्या स्वार्थी बांडगुळांमुळे नीट यूजी २०२६ परीक्षेचा पेपर फुटला. याआधीही नीट परीक्षेत पेपरफुटीच्या घटना घडल्या आहेत. परंतु यंदा एनटीएने संपूर्ण प्रतीक्षाच रद्द केली. त्यामुळे महाराष्ट्रातील दोन लाख ऐंशी हजार तर देशभरातील तब्बल बावीस लाख विद्यार्थ्यांना पुन्हा नीट परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त आणि वैतागलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना दिसून येत आहे. बहुतांश विद्यार्थ्यांमध्ये नकारात्मकता वाढताना दिसत असून अनेक जण चिंताग्रस्त झाले आहेत. काही विद्यार्थ्यांनी टोकाची पावले उचलल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. ही परिस्थिती अत्यंत वेदनादायी, क्लेशदायक व संतापजनक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील तणाव कमी करण्यासाठी पालक, शिक्षक आणि समुपदेशक (काऊन्सिलर) यांनी मोलाची भूमिका बजावणे आवश्यक आहे.

री-नीट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे योग्य प्रकारे कौटुंबिक समुपदेशन (काऊन्सिलिंग) करावे. त्यांच्याशी मित्रत्वाच्या नात्याने संवाद साधावा. निकालाचा दबाव न आणता त्यांच्या अभ्यासाचे योग्य नियोजन करून द्यावे. विद्यार्थ्यांना मानसिक आधार द्यावा आणि त्यांना आपल्या क्षमतेवर शंभर टक्के विश्वास ठेवायला शिकवावे. सर्वप्रथम या मुलांच्या मनातील भीती आणि तणाव दूर करणे गरजेचे आहे. परीक्षेबद्दलची चिंता कमी करण्यासाठी त्यांना धीर द्यावा. विद्यार्थ्यांनी शंभर टक्के प्रयत्न करावेत; पण किती गुण मिळतील, याची अनावश्यक चिंता करू नये.

कधी कधी विद्यार्थ्यांना असे वाटू शकते की आता काहीच आठवत नाही किंवा सर्व विसरून गेलो आहोत; परंतु हे वास्तव नसते. अभ्यासाला पुन्हा सुरुवात करून शिस्तबद्ध रिव्हिजन केल्यास परीक्षेच्या वेळी सर्व हळूहळू आठवू लागते. हा आत्मविश्वास पालक, शिक्षक आणि काऊन्सिलरनी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पालकांसाठी : मुलांचे मिनिट टू मिनिट दैनंदिन वेळापत्रक तयार करून द्या. अनेक मुले रात्री उशिरापर्यंत जागतात, त्यामुळे त्यांची झोप पूर्ण होत नाही. अपुरी झोप एकाग्रता आणि कार्यक्षमता कमी करू शकते. टीनएजर्सना किमान सहा-सात तासांची झोप आवश्यक असते. त्यामुळे लवकर झोपणे आणि लवकर




उठणे महत्त्वाचे आहे. गाढ झोप मेंदूसाठी आवश्यक टॉनिकसारखे कार्य करते. झोपेच्या काळात मेंदू दिवसभरातील माहितीची पुनर्रचना आणि पुनर्संचयन करत असतो. विसरलेले पुन्हा आठवण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते.

झोपेची गुणवत्ता चांगली राहण्यासाठी झोपण्याच्या दोन तास आधी काहीही खाऊ नये. तसेच झोपण्याच्या अर्धा ते एक तास आधी पाणी पिणेही टाळावे. २१ जूनपर्यंत मुलांचे आजारी पडणे परवडणारे नाही. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. मुलांना मास्क वापरायला सांगावे आणि बाहेरील अन्न खाणे टाळावे. डासांपासून संरक्षण करावे. आहार पोषक आणि संतुलित असावा. अनेक मुले नीट जेवत नाहीत तसेच फास्टफुड आणि जंकफुडचे प्रमाण वाढलेले असते. परीक्षेच्या तणावामुळे भूकही कमी लागते. त्यामुळे पालकांनी मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे.

विद्यार्थी मित्रमैत्रिणींसाठी - सकाळी उठल्यानंतर ब्रश करण्यापूर्वी एक ग्लास पाणी प्यावे. प्रातःविधी आटोपल्यानंतर दहा मिनिटे वार्मअप करावा आणि चार-पाच सूर्यनमस्कार घालावेत, वीस मिनिटे ध्यान करावे. त्यानंतर पौष्टिक नाश्ता घ्यावा. नाश्त्यात पेंडखजूर, केळी, ओट्स, चिकू, इडली, डोसा, मोड आलेली मटकी य०ांचा समावेश असावा. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित राहण्यास मदत होते.

दुपारच्या जेवणात वरण-भात, भाजी-पोळी यांचा समावेश करा. संत्रा, मोसंबीचा ज्यूस किंवा लिंबूपाणी प्यावे. रात्रीच्या जेवणात मुगडाळ खिचडी खावी. जेवणानंतर घरात थोडे चालावे. अशा आहारामुळे बद्धकोष्ठता होत नाही आणि मन प्रसन्न राहते. या काळात तळलेले पदार्थ आणि शक्यतो मांसाहार टाळावा. आहारात हिरव्या पालेभाज्या तसेच पिवळ्या-केशरी रंगांची फळे यांचा समावेश असावा.

आहार वेळेवर घ्यावा. योग्य पोषणामुळे एकाग्रता, कार्यक्षमता आणि कौशल्य विकासास मदत होते. अभ्यास करताना कंटाळा आला म्हणून भरपूर स्नॅक्स खाऊ नयेत. भूक लागल्यास पेंडखजूर, मखाना किंवा भाजलेले वाटाणे खावेत. पुरेसे पाणी प्यावे आणि शरीर डिहायड्रेट होणार नाही याची काळजी घ्यावी. बदाम, अक्रोड आणि मेथ्यांचे योग्य प्रमाणात सेवन स्मरणशक्तीसाठी उपयुक्त ठरते. या काळात मोबाईलपासून कटाक्षाने दूर रहावे.

परीक्षेच्या दिवशी अनेकजण घाईघाईत काहीतरी खातात किंवा उपाशी राहतात. त्यामुळे पेपर सोडवताना लक्ष केंद्रित होत नाही. परीक्षा केंद्रावर जाताना किंवा पेपर सुरू होण्यापूर्वी दोन केळी आणि थोडे डार्क चॉकलेट खाल्लयास तनामनाला ऊर्जा मिळते.

मन शांत आणि स्थिर ठेवावे. तणाव अजिबात घेऊ नये. परीक्षा केंद्रावर काही असुविधा असू शकतात; त्यासाठी मानसिक तयारी ठेवावी. कुणीही व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला तरी आपल्या ध्येयावर ठाम रहावे. घाबरू नये, नर्व्हस होऊ नये. परीक्षा केंद्रावर पोहोचल्यानंतर पेपर हाती येईपर्यंत विनाकारण कुणाशीही बोलू नये. त्याऐवजी शांतपणे ध्यान, चिंतन आणि मनन करावे. यश निश्चितच तुमचेच असेल.

यशस्वी भव.!
ऑल द बेस्ट.!

**-शिवाजीराजे पाटील**
नांदेड
राष्ट्रीय अध्यक्ष
वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद

# अहिल्याबाई होळकर : सुवर्ण इतिहासाची तेजस्वी राणी

अहिल्याबाई होळकर या मराठा साम्राज्यातील अत्यंत कर्तृत्ववान, न्यायप्रिय आणि लोकहितवादी राणी होत्या. भारतीय इतिहासात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, पराक्रम आणि समाजसेवेच्या बळावर एक आदर्श राज्यकर्ती म्हणून ओळख निर्माण केली. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. साध्या कुटुंबात जन्म असूनही अहिल्याबाईंच्या मनात लहानपणापासूनच प्रामाणिकपणा, दया आणि समाजसेवेची भावना होती.

लहान वयातच त्यांच्यावर धार्मिक आणि नैतिक संस्कार झाले. त्या नियमितपणे पूजा-पाठ करत असत तसेच वडिलांकडून चांगल्या गोष्टी शिकत असत. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत, दयाळू आणि अभ्यासू होता. गावातील गरीब आणि गरजू लोकांविषयी त्यांना विशेष सहानुभूती होती. लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यांना मदत करण्याची वृत्ती त्यांच्यात लहानपणापासून दिसून येत होती. त्यांच्या या गुणांमुळे त्या इतर मुलांपेक्षा वेगळ्या ठरत होत्या.

अहिल्याबाईंच्या चांगल्या स्वभावामुळे आणि बुद्धिमत्तेमुळे पुढे त्यांना होळकर घराण्यात स्थान मिळाले. त्यांनी आयुष्यभर प्रजेची सेवा, न्याय आणि धर्म यांना महत्त्व दिले. त्यामुळेच आजही त्यांना लोकमाता म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

अहिल्याबाई होळकर यांच्या गुणी आणि संस्कारी स्वभावाची ख्याती दूरवर पसरली होती. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी त्यांच्या बुद्धिमत्ता, साधेपणा आणि सेवाभावी वृत्तीची ओळख पटली. त्यामुळे त्यांनी आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह लावून दिला. विवाहानंतर अहिल्याबाई होळकर घराण्यात दाखल झाल्या आणि त्यांनी राजघराण्याच्या परंपरा तसेच जबाबदाऱ्या समजून घेतल्या.

राजवाड्यातील जीवन स्वीकारताना त्यांनी केवळ कुटुंबाची जबाबदारीच सांभाळली नाही, तर राजकारण, प्रशासन आणि समाजकारण यांचेही ज्ञान मिळवले. मल्हारराव होळकर यांच्याकडून त्यांनी राज्यकारभाराचे धडे घेतले. प्रजेच्या अडचणी समजून घेणे, योग्य निर्णय घेणे आणि न्यायाने वागणे या गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या. त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे आणि कुशल नेतृत्वामुळे त्या लवकरच राजकारणात पारंगत झाल्या. त्यांनी राजघराण्याच्या जबाबदाऱ्या अत्यंत समजूतदारपणे आणि कुशलतेने सांभाळल्या.



मात्र त्यांच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. युद्धामध्ये त्यांच्या पती खंडेराव होळकर यांचे निधन झाले. त्यानंतर काही काळातच त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. या दुःखद घटनांमुळे त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. तरीसुद्धा त्यांनी आपले धैर्य गमावले नाही. संकटांना सामोरे जात त्यांनी स्वतःला मजबूत बनवले आणि प्रजेच्या हितासाठी कार्य करण्याचा निर्धार कायम ठेवला.

अनेक अडचणी असूनही अहिल्याबाईंनी राज्यकारभार आपल्या हातात घेतला. त्यांनी प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. न्याय, प्रामाणिकपणा आणि लोकसेवा या तत्त्वांवर त्यांनी राज्य चालवले. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि विकास निर्माण झाला. कठीण परिस्थितीतही खंबीरपणे उभे राहून आदर्श नेतृत्व कसे करावे, याचे उत्तम उदाहरण त्यांनी संपूर्ण जगासमोर ठेवले.

अहिल्याबाईंची सर्वात मोठी विशेषता म्हणजे त्या प्रजेच्या समस्या स्वतः ऐकत असत. सामान्य लोकांना थेट आपली तक्रार मांडण्याची संधी मिळत होती. त्या लोकांच्या अडचणी शांतपणे ऐकून योग्य तो निर्णय घेत असत. त्यामुळे प्रजेच्या मनात त्यांच्याबद्दल आदर आणि प्रेम निर्माण झाले. त्यांच्या उत्तम राज्यकारभारामुळे त्यांना लोकमाता म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यकारभारात विकासकामे आणि समाजसेवा यांना विशेष महत्त्व दिले. प्रजेचे जीवन सुखकर आणि समृद्ध व्हावे, यासाठी त्यांनी अनेक लोकहितकारी कामे केली. त्यांच्या कार्यामुळे केवळ त्यांच्या राज्यातच नव्हे, तर संपूर्ण भारतातील अनेक धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांचा विकास झाला. त्यामुळे त्या एक दयाळू आणि दूरदृष्टी असलेल्या शासक म्हणून प्रसिद्ध झाल्या.

अहिल्याबाईंनी जनतेच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठीही प्रयत्न केले. त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा आणि व्यापार व्यवस्था सुधारली. चांगले रस्ते तयार झाल्यामुळे व्यापाराला चालना मिळाली आणि लोकांचा प्रवास सुलभ झाला. पाण्याच्या सोयींमुळे शेती आणि जनजीवन सुधारले. त्यांच्या विकासकामांमुळे राज्यातील लोकांचे जीवन अधिक सुखकर, सुरक्षित आणि समृद्ध बनले. त्यामुळे आजही त्यांचे कार्य आदराने आणि अभिमानाने स्मरण केले जाते.

अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील स्त्रीशक्तीचे सर्वोत्तम उदाहरण मानल्या जातात. त्यांनी आपल्या कर्तृत्व, धैर्य आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजात महिलांचे महत्त्व अधोरेखित केले. त्या काळात महिलांना फारशा संधी दिल्या जात नव्हत्या, तरीसुद्धा अहिल्याबाईंनी आपल्या नेतृत्वगुणांनी संपूर्ण राज्य यशस्वीपणे सांभाळले. त्यामुळे त्या महिलांसाठी आत्मविश्वास, धैर्य आणि नेतृत्वाचे प्रेरणादायी प्रतीक ठरल्या.

अहिल्याबाईंच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती आणि पुत्राच्या निधनामुळे त्यांना मोठ्या दुःखाला सामोरे जावे लागले. परंतु त्यांनी संकटांसमोर हार मानली नाही. धैर्याने परिस्थितीचा सामना करत त्यांनी राज्यकारभार आपल्या हातात घेतला. त्या अत्यंत शहाणपणाने आणि न्यायाने राज्य चालवत होत्या. महिलाही कोणत्याही कठीण परिस्थितीत सक्षमपणे नेतृत्व करू शकतात, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले.

त्यांच्या कार्यामुळे समाजात महिलांविषयी आदराची भावना निर्माण झाली. त्यांनी महिलांना केवळ घरापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यातील क्षमता आणि सामर्थ्य जगासमोर आणले. त्यांच्या कर्तृत्वामुळे महिलांनाही समाजात महत्त्वाचे स्थान मिळू शकते, हा विचार अधिक दृढ झाला. आजही अहिल्याबाई होळकर यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणादायी मानले जाते आणि त्यांचा आदर्श अनेकांना पुढे जाण्याची प्रेरणा देतो.

अहिल्याबाई होळकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी होते. त्या मोठ्या साम्राज्याच्या राणी असूनही त्यांच्या स्वभावात अहंकार नव्हता. साधेपणा आणि विनम्रता हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. त्या नेहमी साधे जीवन जगत असत आणि प्रजेबरोबर प्रेमाने वागत असत. त्यांच्या वागणुकीतून नम्रता आणि मानवतेची भावना स्पष्ट दिसून येत होती. त्यामुळे प्रजेच्या मनात त्यांच्याबद्दल विशेष आदर निर्माण झाला होता.

अहिल्याबाई अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्या नियमितपणे पूजा-पाठ आणि धार्मिक कार्य करत असत. परंतु धार्मिक असूनही त्या सर्व धर्मांचा समान आदर करत होत्या. त्यांच्या दृष्टीने सर्व लोक समान होते. त्यांनी विविध धार्मिक स्थळांच्या विकासासाठी मदत केली आणि समाजात धार्मिक सौहार्द टिकवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या राज्यात शांतता आणि ऐक्याचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांचा स्वभाव अत्यंत दयाळू, न्यायप्रिय आणि लोकहितवादी होता. गरीब, गरजू आणि संकटात असलेल्या लोकांना मदत करण्यासाठी त्या नेहमी तत्पर असत. कोणावरही अन्याय होऊ नये यासाठी त्या सतत जागरूक राहायच्या. न्याय देताना त्या पक्षपात करत नसत आणि प्रत्येक व्यक्तीशी समानतेने वागत असत. प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांनी लोकांचे मन जिंकले. त्यांच्या या महान गुणांमुळेच त्या आजही आदर्श शासक आणि लोकमाता म्हणून स्मरणात आहेत.

अहिल्याबाई होळकर यांचे नाव भारतीय इतिहासात अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आपल्या न्यायप्रिय आणि लोकहितवादी राज्यकारभारामुळे जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांनी मातेसारखी काळजी घेतली. त्यामुळेच त्यांना लोकमाता म्हणून सन्मानाने ओळखले जाते. त्यांच्या कार्यामुळे त्या केवळ एक महान राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयात स्थान मिळवणाऱ्या आदर्श शासक होत्या.

भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ महिला शासकांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी न्याय, विकास आणि समाजसेवा यांचा उत्तम समतोल साधून राज्यकारभार केला. त्यांच्या काळात राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि समृद्धी निर्माण झाली. त्यांनी धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे त्यांचे योगदान अमूल्य मानले जाते. त्यामुळे इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत गौरवपूर्ण आहे.

आजही त्यांचे कार्य प्रशासन, समाजसेवा आणि नेतृत्वासाठी प्रेरणादायी मानले जाते. अनेक लोक त्यांच्या विचारांमधून आणि कार्यपद्धतीतून प्रेरणा घेतात. न्यायाने राज्य करणे, लोकांच्या हिताचा विचार करणे आणि संकटांमध्ये धैर्याने उभे राहणे, हे गुण त्यांच्या जीवनातून शिकण्यास मिळतात. त्यामुळेच अहिल्याबाई होळकर यांचे नाव आजही आदर्श नेतृत्वाचे प्रतीक म्हणून स्मरणात आहे.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे संघर्ष, सेवा आणि आदर्श नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे. साध्या कुटुंबातून पुढे येऊन त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर इतिहासात अजरामर स्थान मिळवले. आयुष्यात अनेक संकटे आणि दुःख आले, तरी त्यांनी कधीही धैर्य सोडले नाही. त्यांनी आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

अहिल्याबाईंनी जनतेसाठी केलेले कार्य आजही इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांनी बांधलेली मंदिरे, घाट, विहिरी आणि धर्मशाळा त्यांच्या समाजसेवेची साक्ष देतात. न्यायप्रिय राज्यकारभार, लोकांविषयी असलेली करुणा आणि विकासासाठी केलेले प्रयत्न यांमुळे त्या आजही लोकांच्या स्मरणात आहेत. त्यांच्या विचारांतून समाजसेवा, न्याय, मानवता आणि स्त्रीशक्तीचा महान संदेश मिळतो. त्यांनी दाखवून दिले की खरे नेतृत्व हे लोकांच्या सेवेत असते. त्यामुळे अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सदैव स्मरणात राहतील.

**-प्रा. डॉ. आरती राणे**
अर्थशास्त्र विभाग
के. आर. एम. महिला महाविद्यालय, नांदेड.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : लोककल्याण, बुद्धिचातुर्य आणि सुशासनाचा अजरामर आदर्श

भारतीय इतिहासात अनेक राजे-राण्यांनी पराक्रम गाजविला, परंतु जनतेच्या मनावर आईसारखे प्रेम करणाऱ्या आणि लोकहिताला सर्वोच्च स्थान देणाऱ्या राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशभरात अभिवादन करण्यात येत असून, त्यांच्या कार्याचा गौरव मोठ्या अभिमानाने केला जात आहे. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे न्याय, सेवा, संस्कार, बुद्धिचातुर्य, महिला सक्षमीकरण आणि समर्पणाचा तेजस्वी आदर्श होय.

३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथे जन्मलेल्या अहिल्यादेवींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत इतिहास घडविला. होळकर घराण्यात विवाहानंतर त्यांनी राज्यकारभाराचे बारकावे आत्मसात केले. पती खंडेराव होळकर आणि सासरे मल्हारराव होळकर यांच्या निधनानंतर त्यांनी अत्यंत धैर्याने राज्याची धुरा सांभाळली. त्या काळात महिलांना राज्यकारभारात फारसे स्थान नसतानाही अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्ता, दूरदृष्टी आणि जनसेवेच्या भावनेतून होळकरशाहीला वैभवाच्या शिखरावर नेले.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराची सर्वात मोठी ओळख म्हणजे लोककल्याण. प्रजेच्या सुख-दुःखाला स्वतःचे मानले. राज्यातील शेतकरी, व्यापारी, गरीब आणि सर्वसामान्य जनतेसाठी त्यांनी अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. त्यांच्या दरबारात प्रत्येकाला समान न्याय मिळत असे. त्यामुळेच त्यांना पुण्यश्लोक म्हणून ओळख मिळाली.

अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव केवळ भारतातच नव्हे तर जगभर झाला. त्यांच्या न्यायप्रिय, लोकाभिमुख आणि आदर्श प्रशासनाची दखल घेत ब्रिटिश पार्लमेंटने त्यांना १७ व्या शतकातील महान महिला शासक म्हणून गौरविले होते. ही बाब त्यांच्या कार्याच्या जागतिक प्रभावाची साक्ष देणारी आहे. भारतीय संस्कृती, लोकसेवा आणि सुशासनाचा आदर्श जगासमोर ठेवणाऱ्या त्या पहिल्या महिला शासकांपैकी एक मानल्या जातात.

काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीवेळीही त्यांच्या सामंजस्यपूर्ण आणि दूरदर्शी नेतृत्वाची प्रचिती आली. त्या काळात धार्मिक आणि सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता असतानाही अहिल्यादेवींनी अत्यंत संयमाने मार्ग काढला. ज्ञानवापी परिसर आणि मंदिराच्या विषयात त्यांनी संघर्षाऐवजी सामंजस्य आणि लोकभावनेचा आदर याला प्राधान्य दिले. त्यामुळे काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार शांततेत आणि समाजातील विविध घटकांचा विश्वास जपत पूर्ण झाला.

अहिल्यादेवींनी महिला सक्षमीकरणालाही विशेष महत्त्व दिले. त्या काळात महिलांना मर्यादित स्थान असतानाही त्यांनी महिलांना प्रशासन, समाजकार्य आणि सुरक्षाव्यवस्थेत सहभागी करून घेतले. विशेष म्हणजे अहिल्यादेवींनी सैन्यात महिलांची स्वतंत्र फौज उभी केली होती. महिलांनी स्वसंरक्षणासोबतच राज्यरक्षणातही सक्षम भूमिका बजावावी, हा त्यामागील उद्देश होता. त्यांच्या या निर्णयातून महिलांच्या सामर्थ्यावर असलेला विश्वास आणि प्रगत विचार दिसून येतो.

युरोपमध्ये स्त्री-मुक्ती चळवळीचा



उदय होण्यापूर्वीच अहिल्यादेवींनी महिलांना नेतृत्व, सन्मान आणि समानतेचा अधिकार दिला होता. त्यामुळे अनेक अभ्यासक आणि इतिहास संशोधक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना युरोपमधील स्त्री-मुक्ती चळवळीचा प्रेरणादायी आदर्श मानतात. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून प्रशासन, न्याय, युद्धनीती आणि समाजघडणीतही सक्षम नेतृत्व करू शकते, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

अहिल्यादेवींनी केवळ राज्यकारभारच नाही तर समाज विकासासाठीही मोठे योगदान दिले. त्यांनी आपल्या वैयक्तिक संपत्तीतून संपूर्ण भारतभर लोकहिताची अनेक कामे केली. काशी, गया, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर, बद्रीनाथ, हरिद्वार, उज्जैन यांसारख्या अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि पाण्याच्या सुविधा उभारल्या.

विशेष म्हणजे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांच्या जतन व जीर्णोद्धारासाठीही अहिल्यादेवींनी मोठे योगदान दिले. अनेक ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात त्यांनी घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरूंसाठी आवश्यक सुविधा उभारल्या. धार्मिक स्थळांचा विकास करताना त्यांनी भारतीय संस्कृती आणि अध्यात्म जपण्याचे कार्य केले. आजही देशभरातील अनेक मंदिरांवर आणि घाटांवर अहिल्यादेवींच्या कार्याची छाप स्पष्टपणे दिसून येते.

पाण्याचे महत्त्व ओळखून अहिल्यादेवींनी अनेक ठिकाणी बारव, विहिरी, तलाव आणि घाट बांधले. त्या काळात पाण्याच्या सुविधांचा अभाव असताना त्यांनी उभारलेल्या बारवांनी हजारो लोकांना दिलासा दिला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक गावांमध्ये जलव्यवस्था मजबूत झाली. पर्यावरणाचे महत्त्व त्यांनी आपल्या कामातून समाजाला पटवून दिले. जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन यावर त्यांनी भर दिला. नद्या, घाट आणि तलाव स्वच्छ व सुरक्षित राहावेत यासाठी त्यांनी विशेष काळजी घेतली. आजच्या पर्यावरण संकटाच्या काळात त्यांचे हे विचार अधिक प्रेरणादायी वाटतात.

महेश्वर ही त्यांची राजधानी केवळ प्रशासनाचे केंद्र नव्हते, तर कला, संस्कृती आणि उद्योगाचेही केंद्र बनले. अहिल्यादेवींनी महेश्वर येथे विणकरांना प्रोत्साहन देत प्रसिद्ध महेश्वरी साडी उद्योगाला चालना दिली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे हजारो कुटुंबांना रोजगार मिळाला आणि महेश्वरी साडीला देशभरात वेगळी ओळख निर्माण झाली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय परंपरा, सौंदर्य आणि संस्कृतीचे प्रतीक मानली जाते.

अहिल्यादेवींचा कारभार हा धर्म, संस्कृती आणि समाजसेवेचा सुंदर संगम होता. त्यांनी सर्व धर्मांचा आदर राखत समाजात ऐक्य आणि बंधुभाव जपला. त्यांच्या राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि विकासाला प्राधान्य होते. म्हणूनच इतिहासकारांनी त्यांच्या राज्यकारभाराला रामराज्य अशी उपमा दिली आहे.

भारतीय जनता पक्षानेही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी विचारांचा वारसा जपण्याचे कार्य सातत्याने केले आहे. भाजप सरकारच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि ऐतिहासिक स्थळांचा विकास यावर विशेष भर दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काशी विश्वनाथ कॉरिडॉरसारख्या विकासकामांमधून भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे कार्य अहिल्यादेवींच्या विचारांना पुढे नेणारे असल्याचे मानले जाते.

आजच्या आधुनिक युगातही अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. सत्ता ही केवळ अधिकारासाठी नसून समाजसेवा आणि लोककल्याणासाठी असते, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. त्यांचे संपूर्ण आयुष्य प्रजेच्या सुखासाठी, संस्कृतीच्या जतनासाठी आणि समाजहितासाठी समर्पित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि विचार हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य वैभव आहे. त्यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना, त्यांच्या लोकसेवेचा आदर्श प्रत्येकाने आपल्या जीवनात जपणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**-महेंद्र देमगुंडे,**
नांदेड.

## करू नको अहंकार...

जगी नाम होण्यासाठी
आधी तपावे लागते ।
अरे चंदनासमान
नित्य झिजावे लागते ।।

आयत्याला कुठे इथे
गोड लागते भाकरी ।
त्यांना भोगावे लागते
फक्त दुःख नानापरी ।।

हिनवून दुबळ्यांना
तुझी लायकी दावतो ।
अरे कशाला माणसा
पशु समान जगतो? ।।

तुज मरण येईल
तेंव्हा मातीच होशील ।
देह मातीचा पुतळा
किती काळ टिकशील? ।।

प्रेमरूपी मद्यप्याला
जरा तुझ्या ओठी लाव ।
मदतीला गरिबांच्या
मनोभावे नित्य धाव ।।

जग सद्भावे माणसा
करू नको अहंकार ।
जन्म देणाऱ्यांचे कधी
भुलू नको उपकार ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# पराभूत मानसिकता हेच वार्धक्य, वय फक्त एक आकडा -शिवाजीराजे पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)** –अंकमालेच्या नैसर्गिक नियमानुसार आपले वय दरवर्षी वृद्धी होणारा फक्त एक आकडा आहे. उतारवय नव्हे तर नकारात्मक, खचलेल्या मनाची पराभूत अवस्था हे खरे वार्धक्य होय, असे प्रतिपादन माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले. ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित हॅप्पी सेकंड इनिंग ऑफ लाईफ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन एम. डी. कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सभापती दिलीप सावळे यांच्या हस्ते सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत सिध्दार्थ गोतम बुध्द व राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

यावेळी वैभव तळेकर, प्रा. प्रकाश देवसरकर, अभिजित मुळे, कैलास गिरी, पोलीस पाटील आनंदराव माने, संजय पाटील, रामचंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. शीतल मुंडे, प्रास्ताविक उद्योजक दत्ता देशमुख व आभार प्रा. गजानन सूर्यवंशी यांनी मानले.

पुढे बोलताना वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील म्हणाले की, वाढत्या वयामुळे स्वतःला वृद्ध न समजता ज्येष्ठ समजावे. वृद्धत्व इतरांकडे आधार मागते, तर ज्येष्ठत्व अनेकांना आधार देण्याची क्षमता ठेवते. वृद्धत्व एखादेवेळी याचक होऊ शकेल, परंतु ज्येष्ठत्व नेहमी दातृत्वाच्या आणि विशालतेच्या भूमिकेत वावरते. वृद्धत्व परावलंबी असू शकते, पण ज्येष्ठत्व सदैव स्वाभिमानी आणि स्वावलंबी असते. आयुष्याच्या या टप्प्यावर हे करायचे राहून गेले असा पश्चात्ताप करण्यापेक्षा प्रत्येक क्षण आनंदाने जगावा. जग काय म्हणेल? याची अनाठायी चिंता करून ज्येष्ठांनी स्वतःचे मन मारू नये. हॅप्पीनेस इज नथिंग बट ए स्टेट ऑफ माईंड, आनंदी जीवन हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय असल्याचे स्पष्ट केले. आपला आनंद व्यक्ती, वस्तू किंवा परिस्थितीवर अवलंबून ठेवू नये. आपल्या आनंदाला आपणच कारणीभूत असतो आणि दुःखही आपल्या कर्माचे प्रतिबिंब असते. शारीरिक स्वास्थ्याबरोबरच मानसिकता सदैव सकारात्मक, तरुण, उत्साही आणि ऊर्जावान ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

अत्यंत अभ्यासपूर्ण, प्रेरणादायी आणि खुमासदार शैलीतील व्याख्यानातून लाईफ स्किल कोच इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी उपस्थित अबालवृद्धांना मंत्रमुग्ध केले.

# नांदेड पोलीस दलातील १ डीवायएसपी, ७ पीएसआयसह १४ जण सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा पोलीस दलातील १ उपविभागीय पोलीस अधिकारी, ४ पोलीस उपनिरीक्षक, ३ ग्रेड पोउपनि, ५ पोलीस अंमलदार व १ लिपीक असे १४ अधिकारी व अंमलदार हे नियत वयोमानानुसार दि. ३० मे रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

सर्व सेवानिवृत्तांनी आपल्या कुटुंबास वेळ द्यावा आणि आरोग्याची काळजी घेऊन सुखी आणि आनंदी जीवन जगण्याचा सल्ला दिला. हा कार्यक्रम मंथन हॉल पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड येथे पार पडला. सेवानिवृत्त समारंभास पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनैतिक मानव शाखेचे अच्युत मोरे यांनी केले. जनसंपर्क विभागाचे हवालदार हनमंत पोतदार, मारोती कांबळे, नरेंद्र राठोड, पोलीस कल्याण विभागाच्या सविता भीमलवाड यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये पोलीस उपअधीक्षक साहेबराव गुट्टे, पोउपनि बाबा नागोराव गजभारे, प्रल्हाद संभाजी हैबतकर, बाबु मैसाजी शिंदे, हनुमान कानोजी मेश्राम, सुदाम आमरू आडे, परमेश्वर जळबा कदम, जगदीश मल्हारराव कुलकर्णी, सपोउपनि देविदास सोनबाजी बसवंते, रानबा मारोतराव फड, कैलास किशनराव झडते, दर्शन शिशुपाल यादव, तानाजी माधवराव बिराजदार, आनंदा देवराव बैनवाड यांचा समावेश आहे.

## मसापच्यावतीने आज कविसंमेलन आणि साहित्यिकांचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)**– क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडच्या वतीने कविसंमेलन आणि पुरस्कार प्राप्त मान्यवर साहित्यिकांचा गौरव रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल विसावा पॅलेस येथे आयोजित करण्यात आला आहे.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडच्या वतीने महात्मा फुलेंना अभिवादन करण्यासाठी आयोजित मालिकांमधील हा दुसरा कार्यक्रम आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक गणेशराज सोनाळे, ज्येष्ठ कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या हस्ते मान्यवर साहित्यिकांचा गौरव करण्यात येणार आहे.

## आ. कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)**– उत्तर नांदेड मतदारसंघाचे आमदार बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १ जून रोजी मतदारसंघात विविध सामाजिक, धार्मिक आणि आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, शहरप्रमुख शाम कोकाटे यांच्यासह शिवसेनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या सोहळ्याची सुरुवात मरळक (ता. नांदेड) येथील विमलेश्वर महादेव मंदिर परिसरात सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. विशाल महाराज खोले यांच्या सुश्राव्य हरीकीर्तन कार्यक्रमाने होणार आहे. नांदेड उत्तर मतदार संघाच्या वतीने आयोजित या कीर्तनानंतर लगेचच जाहीर महाप्रसादाचे (नगर भोजन) आयोजन करण्यात आले असून, या प्रसंगी नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीरही भरवले जाणार आहे. आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्ते व मतदारसंघातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

त्याचप्रमाणे वाढदिवसाच्या मुहूर्तावर शहरात सांस्कृतिक आणि व्यापक समाजोपयोगी उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. संध्याकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील ए. के. संभाजी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांच्या भक्तीमय गीतांच्या 'संगीत संध्या' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मुख्य सोहळ्यासोबतच दिवसभरात हनुमान गड येथे महाआरती, नेरली कुष्ठधाम येथे अन्नदान, श्यामनगर येथील स्त्री रुग्णालयात फळ वाटप, तसेच डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात रुग्णांना अन्नदान व वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय शहरप्रमुख श्याम कोकाटे यांच्या वतीने उत्तर मतदारसंघातील काही भागात 'स्वच्छता व जनजागृती मोहीम' देखील राबवली जाणार असून, हितचिंतकांनी आ. कल्याणकर यांना शुभेच्छा देण्यासाठी या विविध कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहनआयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत इंजि. विश्वंभर पवार यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश



**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष इंजि. विश्वंभर पवार यांनी हदगाव येथील शिवसंवाद मेळाव्यात शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. खा. डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या प्रवेश सोहळ्यास भोकर मतदार संघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ते जिल्हा नियोजन व विकास समितीचे सदस्य होते. भोकर येथील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीचे ते संचालक आहेत.

## पोलीस ठाण्यांतील पारदर्शकतेसाठी एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढवून भ्रष्टाचाराला आळा घालण्यात यावा या मागणीसाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवारचे शहर जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी निवेदन सादर केले.

निवेदनामध्ये पोलीस ठाण्यांमध्ये एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वेळा नागरिकांकडून गुन्हा नोंदविण्यासाठी किंवा तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येतात. यामुळे सामान्य नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कमी होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रस्तावित प्रणालीअंतर्गत प्रत्येक एफआयआर किंवा तक्रार नोंद झाल्यानंतर २४ ते ४८ तासांच्या आत पोलीस अधीक्षक कार्यालयातून फिर्यादीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पोलीस ठाण्यातील वागणूक, कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी, कामकाजाबाबतच्या तक्रारी अथवा सूचना आणि पोलीस सेवेबाबतचे समाधान याविषयी माहिती घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढून भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल. तसेच नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असे फैसल सिद्दीकी यांनी सांगितले. हा उपक्रम नांदेड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवून राज्यासाठी आदर्श मॉडेल निर्माण करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

## पल्लवी हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र संकुलातील संशोधक विद्यार्थिनी पल्लवी देवराव



हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात नुकतीच पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

पल्लवी हंबर्डे यांनी मोलुक्युलर इंटरक्शन्स ॲन्ड रिलॅक्सेशन स्टडीज ऑफ सीटेट युजिंग ब्रॉडबँड डायलेक्ट्रिक स्पेक्ट्रोस्कोपी या विषयावर भौतिकशास्त्र संकुलातील प्रो. डॉ. अशोक कुंभारखाणे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. स्वारातीम विद्यापीठात संशोधन प्रबंध सादर केला होता. नुकतीच त्यांना पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली. या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले.



**नांदेड** – लोहा नगरपरिषदेच्यावतीने भाजी मंडई ते जुना लोहा या सीसी रोडच्या कामास सुरूवात झाली असून, मागील ३० ते ४० वर्षांपासून अरूंद असलेला रोड आता मोठा होत आहे. यामुळे नागरिकांना ये-जा करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. (छाया : विनोद महाबळे)

## लिपीक दत्ता काकडे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचालित कुसुमताई प्राथमिक शाळा सिडको नवीन नांदेडचे लिपीक



दत्ता गोविंद काकडे हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे २६ रोजी नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने शनिवार, दि. ३० मे रोजी नवीन कौठा नांदेड येथील आकृती हॉटेल येथे त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी दत्ता काकडे यांनी संस्थेचे पदाधिकारी व शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभल्याबद्दल कतृज्ञता व्यक्त केली.

# केआरएम महिला महाविद्यालयात डॉ. ज्योती देशमुख यांना श्रद्धांजली



**नांदेड (प्रतिनिधी)**– महिला शिक्षण संस्थेच्या सचिव शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्व तथा वैद्यकीय क्षेत्रातील ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. ज्योती दासराव देशमुख यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी नांदेड येथे खाजगी रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय होते. त्यांना भावपूर्ण निरोप देण्यासाठी केआरएम महिला महाविद्यालय नांदेड येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव उर्फ माधवराव धर्माधिकारी देशमुख बरबडेकर, उपाध्यक्ष डॉ. साहेबराव मोरे, सहसचिव प्रा. डॉ. बाबुराव पावडे, प्राचार्य डॉ. विजया देशमुख, प्राचार्य व्यंकटी वाघमारे, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. व्यंकटी पावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या श्रद्धांजली सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना दिलीपराव उर्फ माधवराव देशमुख म्हणाले, गरीब, वंचित, कष्टकरी व श्रमिक यांच्या मुलींना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट केले. डॉ. ज्योती देशमुख ह्या प्रेम, सदाचार, परोपकार व निष्ठेच्या पाईक होत्या. त्यांच्या अंगी एक शिस्त होती. नागरी व ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी महिला महाविद्यालय नांदेड येथे महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या जाण्याने शैक्षणिक क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

उपाध्यक्ष डॉ. साहेबराव मोरे आणि प्रा. डॉ. बाबुराव पावडे यांनी देखील त्यांच्याप्रति आपली सद्भावना व्यक्त केली. प्राचार्य डॉ. विजया देशमुख यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगून संस्थात्मक पातळीवर एक आस्थेवाईक कुटुंबप्रमुख आम्ही गमावला. त्यांच्या अकाली निधनाने वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे .आम्ही एका प्रेमळ माऊलीला मुकलो, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या.

मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. व्यंकटी पावडे यांनी त्यांचे वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्याची ओळख करून दिली आणि श्रद्धांजली सभेचे सूत्रसंचालन केले. उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांना भावपूर्ण निरोप दिला.

यावेळी महाविद्यालयातील कवी मनोज बोरगावकर, प्रा. डॉ. शोभा इंगळे, प्रा. डॉ. सुरेखा कुलकर्णी, प्रा. हुमा कौसर, प्रा. डॉ. भगवान गुंजलवाड, प्रा. डॉ. मेघराज पवार, प्रा. प्रदीप जाधव, प्रा. ज्ञानेश इंगोले, प्रा. श्रीनिवास कल्याणकर, प्रा. सुवर्णा अल्लडवाड, प्रा. प्रियंका तगलपल्लेवार, प्रा. सुनिता जाधव, प्रा. प्रीती गोरे, शिक्षकेत्तर कर्मचारी मनोज भोसले, हरदीपसिंग जमदार व मारुती धुमाळे यांची तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

## डॉ. जे. टी. जाधव यांना छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

**धर्माबाद (प्रतिनिधी)**– अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स या सामाजिक संघटनेचा अतिशय प्रतिष्ठेचा छत्रपती शाहू महाराज



समाजभूषण पुरस्कार २०२६ हा धर्माबाद तालुक्यातील मौ. समराळा येथील रहिवाशी तथा बिंदू महाविद्यालय भोकरचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. टी. जाधव यांना जाहीर करण्यात आला.

प्रा. डॉ. जे. टी. जाधव यांनी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## व्हिएतनाम जिंकणारी 'ट्रिपल महाराष्ट्र केसरी' भाग्यश्री कोळी



**नांदेड (प्रतिनिधी)**– व्हीएतनाम येथे पार पडलेल्या आशियाई चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत 'ट्रिपल महाराष्ट्र केसरी' महिला पैलवान भाग्यश्री मंगेश कोळी हिने सुवर्णपदकाला गवसणी घालीत जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा डंका वाजवला आहे. तिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे केवळ क्रीडा जगताच नव्हे, तर संपूर्ण आदिवासी कोळी जमात बांधवांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे.

सततचे खडतर परिश्रम, कमालीची शिस्त आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर भाग्यश्रीने यापूर्वी सलग तीनदा 'महिला महाराष्ट्र केसरी' बनण्याचा बहुमान मिळवला. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# चंदेरी

## रितेशच्या 'राजा शिवाजी'चे 5 विक्रम, कमावले 109 कोटी!

रितेश देशमुख अभिनीत आणि दिग्दर्शित ऐतिहासिक चित्रपट 'राजा शिवाजी' १ मे रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला. तेव्हापासून हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करत आहे. दमदार कमाईबरोबरच या चित्रपटाने अनेक मोठे विक्रमही आपल्या नावावर केले आहेत. चौथ्या आठवड्यातही चित्रपट जोरदार कमाई करत आहे. या चित्रपटाने २६ दिवसांत सॅकनिल्कच्या वृत्तानुसार १०९.८४ कोटी रूपयांची कमाई केली होती. भारतीय बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा टप्पा पार करणारा हा पहिलाच मराठी चित्रपट ठरला असून, मराठी चित्रपटसृष्टीत त्याने एक नवीन इतिहास रचला आहे. 'राजा शिवाजी'ने जगभरात ११४ कोटी रुपयांहून अधिक कमाई करत मराठीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटाचा जागतिक विक्रमही आपल्या नावावर केला आहे. हा चित्रपट रितेश देशमुखच्या कारकिर्दीतील १०० कोटी क्लबमध्ये पोहोचलेला त्याचा दहावा चित्रपट ठरला आहे. स्वतः दिग्दर्शित केलेल्या प्रादेशिक चित्रपटासह ही कामगिरी करणे, ही त्याच्यासाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी ११.७ कोटी रुपयांची दमदार ओपनिंग चित्रपटाने केली होती. दरम्यान, या चित्रपटात मराठी इंडस्ट्रीतील आणि बॉलीवूडमधील अनेक लोकप्रिय चेहरे महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकले आहेत. त्यामुळे या चित्रपटात कलाकारांची भौज पाहायला मिळतेय.



## रणवीर सिंहच नव्हे 'या' कलाकारांवरही होती बंदी..!


**बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहने 'डॉन ३' चित्रपटातून अचानक माघार घेतल्याने वाद निर्माण झाला आहे. 'फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज'ने (FWICE) रणवीर विरोधात असहकार निर्देश जारी केला आहे. 'डॉन ३' चित्रपटाचे शूटिंग सुरू होण्यासाठी तीन आठवडे बाकी राहिले असताना निर्माते आणि दिग्दर्शकाबरोबर झालेल्या वादामुळे त्याने चित्रपटातून माघार घेतली. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याने चित्रपट निर्माते फरहान अख्तरने रणवीरविरोधात तक्रार दाखल केली होती. यावर 'FWICE'ने अनेकदा चर्चेसाठी बोलावूनही रणवीरने प्रतिक्रिया न दिल्याने थेट बंदीचे आदेश दिले आहेत. या बंदीच्या कारवाईवर सिनेविश्वातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. रणवीरआधी 'FWICE'ने बॉलीवूडच्या काही कलाकारांवर अशाच पद्धतीची बंदी आणली होती.**

चित्रपट निर्मिती संबंधित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि इतर तंत्रज्ञांना शूटिंग किंवा निर्मितीदरम्यान रणवीरबरोबर काम न करण्यास 'FWICE'ने सांगितलं आहे. याचा परिणाम त्याच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगवर होण्याची शक्यता आहे. यावरून सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू असताना सिनेविश्वातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. रणवीर सिंह हा पहिलाच नाही तर यापूर्वी FWICE ने काही कलाकारांवर अशा पद्धतीची बंदीची कारवाई केली होती, यामध्ये लोकप्रिय गायक आणि अभिनेत्यांचा समावेश आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर, FWICE ने भारतात पाकिस्तानी कलाकारांवर बंदी घालण्याची मागणी केली. मात्र, याचवेळी 'सरदार जी ३' या पंजाबी चित्रपटामध्ये पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमीर हिने प्रमुख भूमिका साकारली होती. दिलजीत दोसांझ आणि नीरू बाजवा यांच्या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये ती झळकत होती, यामुळे पंजाबी 'हॉरर-कॉमेडी' चित्रपटाला तीव्र विरोध करत त्याचे प्रदर्शन रद्द करण्यात आले. एका पाकिस्तानी कलाकारासह काम केल्याबद्दल FWICE ने दिलजीतवर 'असहकार' आदेश लागू केला होता. 'बॉर्डर २' चित्रपटाच्या शूटिंगवेळी हा आदेश रद्द करण्यात आला.



## ...म्हणून पंकज त्रिपाठींना बसला होता धक्का!

**पंकज त्रिपाठी हे बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. आजपर्यंत त्यांनी विविध धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. भूमिकेनुसार त्यांचा अभिनय, संवाद बोलण्याची स्टाईल, नेमक्या वेळी आवाजात असणारे चढ- उतार यामुळे पंकज त्रिपाठींच्या अभिनयावर फक्त प्रेक्षकच नाही तर कलाकारही कौतुकाचा वर्षाव करताना दिसतात. पंकज त्रिपाठींचा चाहतावर्ग मोठा आहे.**



आता मात्र पंकज त्रिपाठी त्यांच्या अभिनयामुळे नाही तर त्यांच्या वक्तव्यामुळे चर्चेत आले आहेत. पंकज त्रिपाठींनी अभिनय क्षेत्रात काम करायचे होते, त्यामुळे त्यांनी दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये शिक्षणासाठी प्रवेश घेतला. त्यावेळी त्यांना काय अनुभव आले, पहिल्यांदाच कोणत्या गोष्टी पाहायला मिळाल्या, याबद्दल त्यांनी वक्तव्य केले. पंकज त्रिपाठी म्हणाले, की २००१ ला मी पहिल्यांदा दिल्लीत आलो होतो. त्यावेळी मी पहिल्यांदा मुलींना सिगारेट ओढताना पाहिले होते. ते पाहिल्यानंतर मला धक्का बसला. त्यावेळी मला असे वाटायचे की या कशा मुली आहेत? पण, १५ दिवस दिल्लीत राहिल्यानंतर मला जाणवले की या सगळ्याकडे पाहण्याचा हा योग्य दृष्टीकोण नाही. पुढे पंकत्र म्हणाले, की माझ्या भाषेमुळे, मला इंग्रजी येत नसल्यामुळे लोक मला खूप लवकर जज करत असत. त्यांना असे वाटायचे की ज्यांना इंग्रजी येत नाही, ते गरीब घरातील असणार. तुम्ही कोणती भाषा बोलता यावरून लोक तुमची क्षमता ठरवतात. पण, खरेतर या दोन्हीचा काहीही संबंध नाही. अशा अनुभवांमुळे न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. पण, मी माझ्या आत्मविश्वासावर परिणाम होऊ दिला नाही. ते म्हणाले, की याकडे पाहण्याचे दोन मार्ग असतात. पहिले म्हणजे, यामुळे स्वतःबद्दल कमीपणा वाटू लागतो. दुसरे म्हणजे त्यातून बाहेर पडून स्वतःला आणखी मजबूत बनवता येते. सुदैवाने मी त्या नकारात्मक विचारांमध्ये अडकलो नाही. मला कधीच स्वतःची ओळख हरवल्यासारखं वाटलं नाही आणि त्यामुळेच मी त्या कठीण काळातून बाहेर पडू शकलो. पंकज त्रिपाठींना गॅंग्स ऑफ वासेपुरमधून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. त्या सिनेमानंतर पंकज त्रिपाठींचा संपूर्ण देशभरात चाहतावर्ग निर्माण झाला. कागज, मिमी, मेट्रो इन दिनों, काला, स्त्री, स्त्री २ अशा अनेक सिनेमांतून प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.

## परेश रावल यांनी पुन्हा सोडला 'हेरा फेरी 3'?, कारण काय?



'हेरा फेरी', 'हेरा फेरी २' हे दोन्ही सिनेमे प्रचंड गाजले. कलाकार, त्यांचा अभिनय, कॉमेडी, ॲक्शन या सगळ्यामुळे सिनेमाला प्रचंड लोकप्रियता मिळाली. सुनील शेट्टी, परेश रावल आणि अक्षय कुमार यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले. विशेष म्हणजे सिनेमातील डायलॉगही गाजले. या सगळ्यामुळे या कलाकारांना पुन्हा एकत्र पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक होते. 'हेरा फेरी ३' या सिनेमाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट पाहत आहेत. काही महिन्यांपूर्वी 'हेरा फेरी ३'ची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर परेश रावल यांनी या सिनेमातून एक्झिट घेतल्याचे समोर आले. त्यानंतर अक्षय कुमारने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केल्याची माहिती समोर आली होती. या सगळ्यानंतर परेश रावल सिनेमात काम करणार असल्याचे म्हटले गेले. मात्र, आता पुन्हा एकदा परेश रावल यांनी या सिनेमातून एक्झिट घेतल्याची माहिती समोर आली आहे. परेश रावल यांनी चित्रपटाची सायनिंग अमाउंट परत केली आहे. इतकेच नाही तर त्यावर १५ टक्के व्याजही दिले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, परेश रावल यांचे १५ कोटी इतके एकूण मानधन होते. या करारानुसार, त्यांना उर्वरित रक्कम, १४.८९ कोटी रुपये, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर बरोबर एका महिन्याने मिळणार होती, हे परेश रावल यांना मान्य नव्हते. रिपोर्टनुसार, 'हेरा फेरी ३'चे अनाउन्समेंट टीझरचे शूटिंग 'भूत बंगला'च्या सेटवरच झाले आहे. असे असले तरीही परेश रावल यांनी चित्रपट सोडल्याबद्दल किंवा चित्रपटाच्या शूटिंगबद्दलची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

## मराठी इंडस्ट्री का धोक्यात?



मराठी इंडस्ट्रीची अवस्था खूप वाईट आहे, मराठी चित्रपट थिएटरमध्ये चालत नाही, ते फ्लॉप ठरतात अशी अनेक वक्तव्ये कानी पडत असतात. बऱ्याचदा चित्रपटांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाहीच आणि काहीवेळा चित्रपट केवळ व्यवसाय म्हणून केले जातात असंही अनेकांचं म्हणणं असतं. अशातच आता मराठी इंडस्ट्रीत निर्माते म्हणून नव्याने ओळख मिळवलेले अभिनेते मंगेश देसाई यांनी मराठी इंडस्ट्रीबद्दल भाष्य केलं आहे. मंगेश देसाई यांनी आतापर्यंत अनेक कलाकृतींमध्ये काम करत त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकपसंती मिळवली आहे मात्र, तरीसुद्धा त्यांना अभिनयात अपेक्षित यश मिळालेलं नाही आणि याची खंतीही त्यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केली आहे. यावेळी त्यांनी निर्मिती क्षेत्रात उतरण्याबद्दल आणि अभिनयासह निर्माता म्हणून काम करत असतानाचा अनुभव तसंच सध्याची मराठी सिनेसृष्टीची परिस्थिती याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. पण, यामधून त्यांनी मराठी इंडस्ट्री धोक्यात असल्याचं म्हटलं आहे. मुलाखतीत त्यांना निर्माता म्हणून इंडस्ट्रीतीबद्दल काय वाटतं असं विचारल्यानंतर ते म्हणाले, की निर्माता म्हणून मला इंडस्ट्री खूप धोक्यात आहे असं वाटतं. मराठी सिनेमा मोठा व्हायलाच पाहिजे, तो जगलाच पाहिजे यात वाद नाही, पण मला आता धोक्याची घंटा दिसतेय. कारण- कुठलाही चॅनेल नवीन निर्मात्याचा सिनेमा घेत नाही. या परिस्थितीत निर्मात्यांनी आणि दिग्दर्शकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की एकमेकांना फसवत राहिलो किंवा एकमेकांशीच आपल्या कलाकृतींबद्दल खोटं बोलत राहिलो तर मराठी सिनेमा मोठा होणार नाही.

## श्रद्धाने दिली प्रेमाची कबुली?

**श्रद्धा कपूर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी चाहत्यांसह शेअर करत असते. अभिनेत्रीचा सोशल मीडियावर खूप मोठा चाहतावर्ग आहे. अनेकदा ती तिचे सुंदर फोटो आणि काहीवेळा गंमतीशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच आता तिने नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामुळे ती पुन्हा चर्चेत आलीये.**



श्रद्धा कपूर तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदीबरोबर अनेकदा फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. आता तिने इन्स्टाग्रामवर तिचा एक व्हिडीओ शेअर केलाय जो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यात अभिनेत्री मनसोक्त डान्स करताना दिसत आहे. श्रद्धा या व्हिडीओमध्ये मायकल जॅकसनच्या गाण्यावर थिरकताना दिसतेय. यावेळी तिने कमेंट सेक्शनमध्ये तिच्या अनेक चाहत्यांना प्रतीउत्तर देत तिला अलीकडेच आलेला 'मायकल' हा चित्रपट आवडला असून सध्या ती त्यातच मग्न असल्याचं तिने म्हटलं आहे. हा व्हिडीओ तिचा बॉयफ्रेंड राहुलने शूट केला असून तिने या व्हिडीओला 'कोणीतरी असा शोधा जो तुमच्यातील असं रूप बाहेर आणू शकेल'. अशी कॅप्शन देत ती राहुलला डेट करत असल्याच्या अफवांना दुजोरा दिला आहे. राहुलबरोबर असताना श्रद्धा अनेकदा डान्स करत असते आणि ते व्हिडीओ ती पोस्ट करत असते. श्रद्धाचा डान्स पाहून एका नेटकऱ्याने या व्हिडीओखाली 'हृतिक रोशनच्या मावशीची मुलगी' अशी कमेंट केली. जिला तिने रिप्लायसुद्धा दिला आहे. अशा अनेक कमेंट्स या व्हिडीओखाली पाहायला मिळत आहेत. माध्यमांच्या वृत्तानुसार श्रद्धा व राहुल २०२२पासून एकमेकांना डेट करत आहेत. दोघे जवळपास साडेतीन वर्षे एकमेकांबरोबर असल्याचं म्हटलं जात आहे. शिवाय दोघे अनेकदा एकत्र सार्वजनिक ठिकाणी स्पॉटही होत असतात. राहुल मोदीबद्दल बोलायचं झालं तर तोसुद्धा दिग्दर्शक असून अलीकडेच त्याने अभिनेत्री अनित पड्डाच्या जाहिरातीचं शूटिंग केलं होतं. जी श्रद्धाने इन्स्टाग्रामवर पोस्टही केली होती. शिवाय काही चित्रपटांसाठी त्याने साहाय्यक दिग्दर्शक म्हणून कामही केलं आहे.

## कंगना राणावतच्या आगामी चित्रपटाची चर्चा, लोकप्रिय मराठी अभिनेत्रींची वर्णी...




**अभिनेत्री कंगना राणावतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. अशातच आता या चित्रपटाचं मोशन पोस्ट रिलीज झालं आहे. महत्त्वाचं म्हणजे या चित्रपटात काही लोकप्रिय मराठी कलाकार झळकणार आहेत.**

कंगना अलीकडेच तिच्या 'क्वीन २' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान दिसली होती. त्यावेळी तिच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि हातातील हिरवा चुडा यामुळे सगळ्यांचं लक्ष वेधलं होतं. पण तो तिचा चित्रपटातील लूक असल्याचं तिने सोशल मीडियामार्फत स्पष्ट केलं होतं. अशातच आता तिच्या आगामी चित्रपटाचा पोस्टर समोर आला असून हा सिनेमा १२ जूनला रिलीज होणार आहे. कंगनाच्या मनीकर्णीका फिल्मस् प्रोडक्शन हाऊसच्या सोशल मीडिया पेजवरून या चित्रपटाचं मोशन पोस्टर शेअर करण्यात आलं आहे. पोस्टरमध्ये कंगनाचा चित्रपटातील लूक पाहायला मिळत आहे. २००८साली मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर हा चित्रपट आधारित असल्याचं म्हटलं जात आहे.

### चित्रपटात झळकणार मराठी अभिनेत्री

कंगनाच्या या चित्रपटात मराठी इंडस्ट्रीतील अनेक लोकप्रिय अभिनेत्री झळकणार आहेत. यामध्ये प्रिया बेर्डे ते गिरिजा ओक या अभिनेत्रींचा समावेश आहे. मनोज तपाडिया दिग्दर्शित या चित्रपटात कंगना मुख्य भूमिकेत असून तिनेच या चित्रपटाची निर्मितीसुद्धा केली आहे. या चित्रपटात स्मिता तांबे, इशा डे, सुहिता थत्ते, आशा शेलार अशा लोकप्रिय मराठी अभिनेत्री झळकणार आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुक्ता अजून वाढली आहे. दरम्यान, कंगणा शेवटच्या इमर्जन्सी आणि कनप्पा या चित्रपटांत झळकली होती. तिने आतापर्यंत विविध विषय असलेल्या अनेक चित्रपटांत काम केलं आहे. अभिनयासह दिग्दर्शन आणि निर्मितीसुद्धा ती करत असते.



## 'आनंदी'ची टॉप 3 मध्ये एन्ट्री! टॉप 10 मालिकांची यादी...

छोट्या पडद्यावरील मालिकांची लोकप्रियता ही दर आठवड्याच्या टीआरपी रेटिंगवरून ठरवली जाते. गेल्या साडेतीन वर्षांपासून यात सायली-अर्जुनची 'ठरलं तर मग' मालिका बाजी मारताना दिसतेय. कारण, अनेक नव्या मालिका सुरू होऊनही 'ठरलं तर मग'ने आपलं पहिलं स्थान अजिबात गमावलेलं नाहीये. या मालिकेचा चाहतावर्ग आणि लोकप्रियता ही दिवसेंदिवस वाढतेय. नुकताच १६ मे ते २२ मे या आठवड्याभराचा टीआरपी BARC इंडियाने जाहीर केला. याद्वारे टॉप-१० मालिका कोणत्या आहेत जाणून घेऊयात... गेल्या आठवड्याच्या टीआरपी रिपोर्टनुसार 'स्टार प्रवाह'च्या सायंकाळी ६:३० ते रात्री ११:३० पर्यंतच्या सगळ्या मालिका स्लॉट लीडर ठरल्या आहेत. टीआरपीमध्ये पहिल्या-दुसऱ्या स्थानी नेहमीप्रमाणे 'ठरलं तर मग' आणि 'तू ही रे माझा मितवा' या मालिका आहेत. तर, तिसऱ्या स्थानावर 'आनंदी'ची एन्ट्री झाली आहे. 'आनंदी' मालिका मार्च महिन्यातच प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. या मालिकेला अवघ्या दोन महिन्यांत प्रेक्षकांची भरभरून पसंती मिळतेय. 'आनंदी' ९:३० वाजताची स्लॉट लीडर मालिका ठरली आहे. 'आनंदी'ने 'तारिणी'ला मागे टाकलं आहे. टीआरपीमध्ये चौथ्या स्थानी 'सनई चौघडे' आणि 'कमळी' या मालिका आहेत कारण, गेल्या आठवड्यात प्रेक्षकांना या दोन्ही मालिकांचा महासंगम पाहायला मिळाला होता. तर, 'तारिणी' पाचव्या स्थानी आहे. आता येत्या जून महिन्यात 'तारिणी'ने प्रेमाची कबुली दिल्यावर या मालिकेच्या टीआरपीमध्ये मोठी वाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. टॉप १० मालिकाः ठरलं तर मग, तू ही रे माझा मितवा, आनंदी, सनई चौघडे आणि कमळी महासंगम, तारिणी, बाई तुझा आशीर्वाद, मी सावित्रीबाई जोतीराव फुले, दीपज्योती, वीण दोघांतली ही तुटेना, देवमाणूस (तिन्ही मालिकांना सारखंच रेटिंग), घरोघरी मातीच्या चुली, लग्नानंतर होईलच प्रेम

# दिल्लीत आयएसआयच्या ९ एजंटांना अटक

**धार्मिक स्थळे आणि सरकारी इमारतींवर हल्ला करण्याचा कट उधळला**

**दादर रेल्वे स्थानकाची केली होती रेकी, भारतीय सूत्रधारांचा शोध सुरू**

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि दाऊद इब्राहिमच्या गुन्हेगारी जगताशी संबंधित नऊ जणांना अटक केली. त्यांच्याकडून शस्त्रे, ग्रेनेड आणि स्फोटके जप्त करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, हे लोक एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट रचत होते. दिल्ली आणि मुंबईतील प्रमुख धार्मिक स्थळे, सरकारी इमारती, मंत्रालये आणि सुरक्षा दल ही त्यांची लक्ष्ये होती. तपासानुसार, हे दहशतवादी मॉड्यूल बऱ्याच काळापासून तयार होत होते. आरोपी पाकिस्तानस्थित सूत्रधारांच्याही संपर्कात होते.



एएनआय या वृत्तसंस्थेने पोलिसांच्या सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, आरोपी दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील असून, त्यात काही नेपाळी नागरिकांचाही समावेश आहे. सुरक्षा यंत्रणा आता सूत्रधार आणि स्थानिक सूत्रधारांचा शोध घेत आहेत.

दिल्ली पोलीस आता या मॉड्यूलच्या निधीचे स्रोत, भरती प्रक्रिया आणि लॉजिस्टिक सपोर्ट सिस्टीमचा तपास करत आहे. या कटात कथितरित्या सामील असलेल्या स्थानिक मध्यस्थ आणि परदेशी सूत्रधारांच्या भूमिकेचीही चौकशी केली जात आहे. गेल्या दोन महिन्यांत आयएसआयच्या एजंटांनाही अटक करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशातील दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि विशेष कृती दलाने (एसटीएफ) एका पाकिस्तानी दहशतवादी गटातील चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली. ते भाजप कार्यालये, रुग्णालये, शाळा आणि इतर अनेक संवेदनशील ठिकाणी स्फोट घडवण्याचा कट रचत होते.

पंजाब पोलिसांच्या प्रतिगुप्तचर विभागाने आयएसआय-समर्थित दहशतवादी गटाचा पर्दाफाश केला. भाजप कार्यालये, रुग्णालये, शाळा आणि इतर संवेदनशील ठिकाणी स्फोट घडवण्याचा कट रचण्यात दोषी आढळलेल्या तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली.

गेल्या वर्षी, १० नोव्हेंबर रोजी दहशतवाद्यांनी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कार बॉम्बस्फोट घडवला होता. या स्फोटात ११ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. या हल्ल्यामागे अल-कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंटशी संबंधित एका गटाचा हात होता.

# १४ वर्षांच्या श्रेयने स्पेलिंग बी स्पर्धा जिंकली : सलग पाचव्यांदा भारतीय वंशाचा विद्यार्थी ठरला विजेता

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) –** अमेरिकेतील सर्वात कठीण मानली जाणारी 'स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी' ही स्पर्धा १४ वर्षीय भारतीय-अमेरिकन विद्यार्थी श्रेय पारिखने जिंकली आहे. कॅलिफोर्नियाच्या श्रेय पारिखने ९० सेकंदात ३२ शब्दांची अचूक स्पेलिंग लिहून न्यू जर्सीच्या १२ वर्षीय ईशान गुप्ताला हरवून हे विजेतेपद पटकावले.




कॅलिफोर्नियातील रँचो कुकामोंगा येथील रहिवासी श्रेय पारिख आठवी इयत्तेतील विद्यार्थी आहे. स्पेलिंग बीच्या नियमांनुसार, हे त्याचे शेवटचे वर्ष होते, कारण आठवी इयत्तेनंतर स्पर्धक भाग घेऊ शकत नाहीत. विजयासह त्याला ५० हजार डॉलरची बक्षीस रक्कम आणि प्रतिष्ठित स्क्रिप्स कप मिळाला. भारतीय वंशाच्या विद्यार्थ्याने स्पेलिंग बीचे विजेतेपद पटकावण्याची ही सलग पाचवी वेळ आहे.

यावेळी स्पर्धा इतकी चुरशीची होती की ९ फेऱ्यांनंतरही विजेता निश्चित होऊ शकला नाही. श्रेयने (फिलेपिट्टा) आणि ईशानने (एर्टेबोले) हे शब्द बरोबर लिहिले, त्यानंतर परीक्षकांनी स्पेल-ऑफ घेतले. स्पेल-ऑफमध्ये ९० सेकंदांच्या आत जास्तीत जास्त शब्दांची अचूक स्पेलिंग सांगावी लागते. श्रेयने ३५ पैकी ३२ शब्द बरोबर सांगितले आणि नवा विक्रम केला. ईशानने २५ शब्द बरोबर लिहिले. एक विजेता निश्चित करण्यासाठी २०२१ मध्ये स्पेल-ऑफ नियम सुरू करण्यात आला होता. यात एक स्पर्धक मंचावर स्पेलिंग सांगतो, तर दुसरा वेगळ्या खोलीत हेडफोन लावून बसतो. नंतर दोघांनाही तेच शब्द त्याच क्रमाने विचारले जातात.

'नॅशनल स्पेलिंग बी'ची सुरुवात १९२५ मध्ये वॉशिंग्टन डीसी येथे झाली होती. पहिल्या स्पर्धेत फक्त ९ मुलांनी भाग घेतला होता. ११ वर्षांचे फ्रँक न्यूहॉसर पहिले विजेते ठरले होते आणि त्यांना ५०० डॉलरची सोन्याची नाणी बक्षीस म्हणून मिळाली होती.

# २०० कोटींच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात जॅकलिन फर्नांडिसवर आरोपपत्र दाखल

**मुंबई (प्रतिनिधी) –** अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. २०० कोटींच्या फसवणूक प्रकरणात जॅकलिन फर्नांडिसविरोधात मनी लॉन्ड्रिंगचा खटला चालणार आहे. दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने २०० कोटी रुपयांच्या कथित फसवणूक आणि मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात महत्त्वाचा निर्णय दिला आहे. न्यायालयानं सुकेश चंद्रशेखर, त्याची पत्नी लीना मारिया पॉल, अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस आणि इतर आरोपींविरोधात आरोप निश्चित केले आहेत.



२०० कोटी रुपयांच्या कथित फसवणूक आणि मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात जॅकलिन फर्नांडिसचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. पटियाला हाऊस न्यायालयाने या प्रकरणात घेतलेल्या निर्णयामुळे, जॅकलिन फर्नांडिसविरोधात मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत नियमित खटला चालवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणात आता न्यायलयीन सुनावणी पुढील टप्प्यात जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

याशिवाय, न्यायालयानं महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या प्रकरणातही सुकेश चंद्रशेखर, लीना मारिया पॉल आणि इतर आरोपींविरोधात आरोप निश्चत केले आहेत. दरम्यान, न्यायालयाने सर्व आरोपींना औपचारिक स्वाक्षरी करण्यासाठी ३ जून रोजी कोर्टात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

काही महिन्यांपूर्वी जॅकलिन फर्नांडिझने या प्रकरणात अर्ज दाखल करुन सुकेश चंद्रशेखरविरोधात माफीची साक्षीदार होण्याची तयारी दर्शवली होती. तपास यंत्रणांना सहकार्य करण्यास तसेच सत्य उघडकीस आणण्यास मदत करण्याची इच्छा तिनं व्यक्त केली होती. माफीच्या साक्षीदाराच्या दर्जा दिल्यास या प्रकरणाच्या तपासात महत्त्वाची माहिती समोर आणण्यास मदत करणार असल्याचंही अभिनेत्रीनं म्हटलं होतं. तिच्या या निर्णयामुळे या प्रकरणात अनेक माहिती उघड होण्याची शक्यता होती. मात्र, न्यायालयाने तिने दाखल केलेला अर्ज फेटाळला. अदिती सिंहच्या तक्रारीच्या आधारे दिल्ली पोलिसांनी या प्रकरणात एफआयआर दाखल केली होती. तपास यंत्रणांनुसार, कथित फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखरवर, कोट्यवधी रुपये उकळणे आणि त्या पैशांचा विविध मार्गांनी वापर केल्याचा आरोप आहे. ईडीचा आरोप आहे की, सुकेशकडून जॅकलिनला विविध महागडे भेटवस्तू मिळाले आहेत. दरम्यान, अभिनेत्रीने कायम हेच सांगितले की, तिला या कथित गुन्हेगारीच्या संबंधित उत्पन्नाच्या स्त्रोताबद्दल माहिती नव्हते. दरम्यान, या प्रकरणात आता जॅकलिनला ३ जून रोजी न्यायालयात हजर राहावे लागेल.

# पिंपरीतील विषारी दारुकांडाचे भिवंडी कनेक्शन उघड

## भिवंडी येथील धाडीत ५,९२९ किलो मिथेनॉल जप्त

**मुंबई (प्रतिनिधी) –** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथे विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे १८ जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर भिवंडी येथील मेसर्स रेक्स इंटरनॅशनल या कंपनीवर धाड टाकून मिथेनॉलचा भिवंडी येथे धाड टाकून ५,९२९ किलो साठा जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात पुणे प्रकरणातील दारूमध्ये वापरण्यात आलेले मिथेनॉल याच कंपनीकडून पुरविण्यात आल्याचे समोर आले आहे.

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा आस्थापनेला कोणतीही सवलत दिली जाणार नाही. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० तसेच संबंधित कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर व न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. सुरक्षित अन्न व औषधे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून तो सुनिश्चित करणे हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे, असे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे.

विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. अवघ्या ३० रुपयांत विकल्या जाणाऱ्या या दारूमध्ये 'मिथेनॉल' हे विषारी रसायन मिसळण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर मिथेनॉलच्या अवैध साठ्यांविरोधात तातडीने कारवाईचे आदेश दिले.

पोलीस तपासानुसार, मृत व्यक्तींनी फुगेवाडी येथील कर्नालसिंग विरका यांच्या ठिकाणी हातभट्टीची दारू सेवन केली होती.



विरका याला ही दारू योगेश वानखेडे याच्याकडून मिळाली होती. पुढील तपासात योगेश वानखेडे हा उरळी कांचन येथील राजू प्रजापती याच्याकडून दारू घेऊन पुरवठा करत असल्याचे निष्पन्न झाले. या साखळीतील दारूमध्ये वापरलेले मिथेनॉल मेसर्स रेक्स इंटरनॅशनलकडून प्राप्त झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

कंपनीचे कार्यालय वाशी येथे असून गोदाम अनंत अँड कंपनी, गाळा क्र. ५४४/ए, म्हात्रे कंपाउंड, अंजूर रोड, वळगाव, भिवंडी येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार ठाणे येथील औषध निरीक्षक योगेंद्र पोळ यांनी धाड टाकली.

तपासणीदरम्यान कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे व सक्षम व्यक्ती अभिषेक अरुणकुमार चौबे उपस्थित नव्हते. कारवाईत एकूण ५,९२९ किलोग्रॅम मिथेनॉलचा साठा आढळून आला. मात्र या विषारी रसायनाच्या खरेदी-विक्रीची कोणतीही अधिकृत नोंद, साठा नोंदवही अथवा आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती.

# जनगणना करणाऱ्या महिलेला मारहाण; पोलिसांना सुरक्षा पुरवण्याचे निर्देश

**पुणे (प्रतिनिधी) –** पुण्यात जनगणनेचे काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. महापालिका आयुक्तांनी या प्रकरणी पोलिसांना पत्र लिहून हल्लेखोरांवर कारवाई करण्याचे निर्देश दिलेत.

देशासह राज्यात सध्या जनगणनेचे काम सुरू आहे. यासाठी शिक्षकांसह विविध सरकारी कार्यालयांतील कर्मचारी प्रगणक म्हणून घरोघरी जाऊन जनगणनेचे काम करत आहेत. पण आता हे कर्मचारी नक्की कोणते काम करत आहेत याची कल्पना नसल्यामुळे अनेक ठिकाणी या कर्मचाऱ्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर एका महिला प्रगणकाला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. त्यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना पत्र लिहून सदर महिला कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्याचे निर्देश दिलेत.

अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी याविषयी बोलताना सांगितले की, सध्या ज्या भागात जनगणनेचे काम सुरू आहे, तिथे पोलिसांची गस्त वाढवण्याची गरज आहे. विशेषतः झोपडपट्टी भागात पालिकेच्या कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेसाठी महापालिकेच्या सुरक्षा रक्षकांना पाठवण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

# सीएनजी दरात पुन्हा २ रुपयांची वाढ; पीएनजीचे दरही वाढले

**मुंबई (प्रतिनिधी) –** पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींनी हैराण झालेल्या मुंबईकरांना आता पुन्हा एकदा महागाईचा आणखी एक मोठा झटका सहन करावा लागणार आहे. कारण मुंबई आणि महानगरामध्ये सीएनजीच्या दरात पुन्हा २ रुपयांची दरवाढ करण्यात आलीय. आता सीएनजीचा दर प्रतिकिलो ८६ रुपयांवर पोहोचलाय. तर पीएनजीमध्येही ५० पैशांची वाढ करण्यात आली असून हे दर आता प्रति युनिट ५२ रुपयांवर पोहचले आहे. या दरवाढीमुळे रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनचालकांचे बजेट कोलमडणार आहेत. सोबतच वाहतूक खर्च वाढल्यानं सर्वसामान्यांच्या खिशालाही मोठी कात्री लागणार आहे.

दरम्यान, आजपासूनच (३० मे) सीएनजी आणि पीएनजीची दरवाढ लागू होणार आहे. आजपासून (शनिवार) संपूर्ण मुंबई आणि महानगर प्रदेशात (एमएमआर) कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) महाग होणार आहे. महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) किरकोळ दरात २ रुपये प्रति किलोने वाढ केली आहे, तर पाईपद्वारे मिळणाऱ्या स्वयंपाकाच्या गॅसच्या दरातही ५० पैसे प्रति युनिटने वाढ होणार आहे. या नवीन बदलामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि परिसरातील इतर भागांमध्ये सीएनजीचा दर ८४ रुपये प्रति किलोवरून ८६ रुपये प्रति किलो होणार आहे. याचा परिणाम दैनंदिन प्रवास करणाऱ्यांवर होणार आहे. कारण ऑटोरिक्षा, टॅक्सी आणि बस अजूनही मोठ्या प्रमाणावर या इंधनावर अवलंबून आहेत. पाईपद्वारे मिळणाऱ्या गॅसचा दर ५२ रुपये प्रति युनिटपर्यंत वाढणार असून, याचा परिणाम एमएमआर प्रदेशातील ३१ लाखांहून अधिक कुटुंबांवर होईल.

दरम्यान, या दरवाढी बाबत बोलताना मुंबई रिक्षा युनियनचे नेते थम्पी कुरियन म्हणाले की, गॅसच्या दरात वाढ झाल्यामुळे भाडेवाढीच्या सूत्राची पुनर्गणना करावी लागली आहे. वाढते इंधन दर विचारात घेणाऱ्या सूत्रानुसार, मूळ भाड्यात प्रति किलोमीटर अंदाजे रू.१.१२ ने वाढ करणे आवश्यक आहे, जी एक रुपयाच्या भाडेवाढीच्या बरोबरीची आहे, असे ते शुक्रवारी म्हणाले. भाडेवाढीचा प्रस्ताव परिवहन विभागाकडे (एमएमआरटीए) पाठवला जाईल, जो कोणत्याही ऑटो-टॅक्सी भाडेवाढीबाबत अंतिम निर्णय घेतो. गेल्या वर्षभरात सीएनजीच्या दरात वाढ झाल्यामुळे टॅक्सी संघटनांनीही मूळ भाड्यात किमान रू.२-३ ची वाढ करण्याची मागणी केली आहे.

# पश्चिम बंगालमध्ये खासदार अभिषेक बॅनर्जींवर प्राणघातक हल्ला

**कोलकत्ता (वृत्तसंस्था) –** पश्चिम बंगालमधील सोनारपूर दक्षिणमध्ये टीएमसी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. ते निवडणुकीतील हिंसाचाराचे बळी ठरलेल्या टीएमसी कार्यकर्त्यांना भेटायला आले होते. तिथे पोहोचताच भाजप कार्यकर्त्यांनी त्यांना घेरले आणि घोषणाबाजी करत त्यांच्यावर हल्ला केला. लोकांनी त्यांच्यावर दगड, चपला आणि अंडी फेकली, तसेच त्यांचा शर्ट फाडला. हेल्मेट घालून अभिषेक यांना त्या भागातून बाहेर काढण्यात आले. हल्ल्यानंतर माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचे पुतणे अभिषेक म्हणाले, बघा त्यांनी माझ्यासोबत काय केले. हे पूर्वनियोजित होते. या भागात पोलीस नाहीत. त्यांना मला मारायचे होते. हेल्मेटमुळे माझे डोके वाचले. आम्ही अशा हल्ल्यांना घाबरणार नाही.

अभिषेक बॅनर्जी म्हणाले, ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मी या घटनेबाबत उच्च न्यायालयात दाद मागणार आहे आणि राज्यपालांनाही कळवणार आहे. जोपर्यंत स्थानिक पोलीस आपले दल पाठवून पीडितांच्या कुटुंबीयांना सुरक्षा देत नाहीत, तोपर्यंत मी हे ठिकाण सोडणार नाही. अभिषेक बॅनर्जी यांनी या हल्ल्यासाठी भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील पश्चिम बंगाल सरकारला जबाबदार धरले.

# काँग्रेसच्या सोशल मीडिया, ओबीसी, एससी व अल्पसंख्यांक विभागाच्या नवनियुक्त तालुकाध्यक्षांची कार्यशाळा संपन्न

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यात काँग्रेसची पक्ष संघटना अधिक सक्षम आणि सक्रिय करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या संघटन सृजन अभियानांतर्गत सात हजार नविन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरु आहे. या नवनियुक्त पदाधिका-यांसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने पक्षाचे मुख्यालय दादरच्या टिळक भवनमध्ये दिनांक २६ मे ते ३० मे २०२६ या कालावधीत ओबीसी, अल्पसंख्याक, एस. सी. व सोशल मीडिया विभागासाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.



प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार, जनसंपर्क, सोशल मीडिया संवाद, बूथस्तरीय नियोजन आणि विविध समाजघटकांशी समन्वय यांसारख्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनीही यावेळी पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेला प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ड. गणेश पाटील, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष यशपाल भिंगे, एस. सी. विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष रमेश शेट्टी, सरचिटणीस गुरबिंदर बच्चर, अभिजित सपकाळ, सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष हृषिकेश पाटील, प्रवक्ते हनुमंत पवार आदी उपस्थित होते. प्रदेश काँग्रेसच्या प्रशिक्षण विभागाचे प्रमुख आशुतोष शिर्के, निमिष साने, यांच्या पुढाकाराने या कार्यशाळांचे नियोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध ठ.ग. संग्राम खोपडे यांनीही मार्गदर्शन केले.

## डीग्री प्रमाणपत्र हरवले

माझी बालाजी उत्तमराव भोसीकर या नावाची एम. ए. मानसशास्त्र या विषयाचे डीग्री प्रमाणपत्र शिवाजीनगर ते वजिराबाद दरम्यान ऑटो प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडले असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**– संपर्क पत्ता –**

**बालाजी उत्तमराव भोसीकर**

**रा. नवीन कौठा नांदेड. मो. ९०२८११३३४४**

# प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यांसाठी सुप्रीम कोर्टाचे हायकोर्टांना १२ निर्देश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील सर्व उच्च न्यायालयांमधील निकालांच्या विलंबावर चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाने सांगितले की, कोणत्याही प्रकरणात निकाल राखून ठेवल्यानंतर, तो तीन महिन्यांच्या आत दिला गेला पाहिजे. जर तीन महिन्यांच्या आत निकाल दिला गेला नाही, तर उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल हे प्रकरण सरन्यायाधीशांसमोर ठेवतील. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असेही म्हटले आहे की, जामीन अर्जांवरील आदेश त्याच दिवशी दिले पाहिजेत. जर निकाल राखून ठेवला असेल, तर तो दुसऱ्या दिवशी जारी केला पाहिजे आणि त्वरित वेबसाइटवर अपलोड केला पाहिजे.

न्यायालयाने या संदर्भात १२ निर्देश जारी केले. हे निर्देश झारखंड सरकारशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान देण्यात आले, ज्यामध्ये असा आरोप करण्यात आला होता की उच्च न्यायालयाने २०२२ पासून कोणताही निकाल दिलेला नाही. चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एका प्रकरणात न्यायालयाने हा आदेश जारी केला. या प्रकरणात अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायातील चार दोषींच्या याचिकांचा समावेश आहे. त्यांनी सांगितले की, त्यांचे फौजदारी अपील २०२२ पासून झारखंड उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, परंतु अद्याप निकाल दिलेला नाही. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, निकालास होणारा हा विलंब संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत हमी दिलेल्या जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करतो. यामध्ये वेळेवर सुनावणीचा आणि न्याय मिळण्याच्या अधिकाराचा समावेश आहे.

**सुप्रिम कोर्टाचे उच्च न्यायालयांना १२ निर्देश जारी केले**

उच्च न्यायालयांनी नियमित जामीन आणि अटकपूर्व जामिनासह वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांना गती द्यावी. जामिनाच्या याचिकांवर त्याच दिवशी सुनावणी होऊन आदेश दिले जावेत आणि अपलोड केले जावेत. जर एखादा आदेश राखून ठेवला असेल, तर तो दुसऱ्या दिवशी दिला जावा. जामीन किंवा शिक्षेला स्थगिती देण्याच्या आदेशांसंबंधीची माहिती तत्काळ तुरुंग प्रशासनाला पाठवली पाहिजे, जेणेकरून आरोपी/दोषी व्यक्तीला त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी सोडले जाऊ शकेल, मात्र अट ही आहे की, तो/ती दुसऱ्या कोणत्याही प्रकरणात हवा/हवी असलेली नसावी किंवा त्याने/तिने जामिनाच्या अटींचे पालन केलेले नसावे. जर प्रकरण मृत्युदंडास पात्र असलेल्या फौजदारी गुन्ह्याशी संबंधित असेल आणि आरोपी तुरुंगात असेल, तर न्यायाधीश निकाल राखून ठेवल्याच्या सात दिवसांच्या आत दोन्ही पक्षांकडून स्पष्टीकरण मागवू शकतात. इतर प्रकरणांमध्ये, न्यायालय निकाल राखून ठेवल्यानंतर एक महिन्यापर्यंत स्पष्टीकरण किंवा युक्तिवाद मागवू शकत नाही. उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवरून दर महिन्याला सरन्यायाधीशांना निकालासाठी राखून ठेवलेल्या प्रकरणांची माहिती देणारा एक स्वयंचलित ईमेल पाठवला पाहिजे. त्याची एक प्रत संबंधित खंडपीठालाही पाठवली पाहिजे.

जर निकालाचा कार्यकारी भाग दिला गेला असेल आणि सविस्तर निकाल १५ दिवसांच्या आत अपलोड केला गेला नसेल, तर रजिस्ट्रार जनरल सरन्यायाधीशांना कळवतील. संबंधित खंडपीठाला दोन दिवसांच्या आत सूचित केले जाईल. जर निकाल राखून ठेवल्याच्या तीन महिन्यांच्या आत दिला गेला नसेल, तर कोणताही पक्ष निकाल प्रसिद्ध करण्यासाठी अर्ज करू शकतो. अशा अर्जांवर दोन दिवसांच्या आत सुनावणी झाली पाहिजे.जर तीन महिने अधिक एक महिना (एकूण चार महिने) निकाल दिला गेला नाही, तर कोणताही पक्षकार मुख्य न्यायमूर्तींकडे खटला दुसऱ्या खंडपीठाकडे सोपवण्यासाठी अपील करू शकतो.

## सनद हरवली

माझी शेख नेहाल चाऊस शेख मोसीन चाऊस या नावाची इयत्ता दहावी पासची सनद आयटीआय कॉर्नर ते वजिराबाद दरम्यान ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता. –**

**शेख नेहाल चाऊस शेख मोसीन चाऊस**

**मखदुम नगर, नवी आबादी, नांदेड**

**मो. ८९९९७९५७५७**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## हिंगोली गेट उड्डाण पुलाखालील अतिक्रमण हटविताना वाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान हिंगोली गेट येथील उड्डाण पुलाखाली करण्यात आलेल्या अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली. शनिवार, दि. ३० मे रोजी कारवाई करण्यात येत असताना तथाकथित जागा मालक व महापालिका अधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाल्याने कारवाई तात्पुरती थांबवावी लागली.



हिंगोली गेट उड्डाण पुलाखाली काही व्यक्तींनी जनावरे बांधून ठेवली होती. तसेच कडब्याचे ढीग साठवून अतिक्रमण केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेला प्राप्त झाल्या होत्या. याबाबत संबंधिताना वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण हटविण्यात आले नव्हते. त्यामुळे उपायुक्त अजितपालसिंग संधू यांच्या आदेशानुसार महापालिकेचे अधिकारी शनिवारी सकाळी अतिक्रमण हटविण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी संबंधित जागेच्या मालकांनी सदर जागेबाबत न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याचा दावा करत कारवाईस विरोध केला. जागेच्या मालकी हक्कासंदर्भातील वाद न्यायप्रविष्ट असल्याने महापालिकेने अतिक्रमण काढू नये, अशी त्यांची भूमिका होती. मात्र, सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कारवाई आवश्यक असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही पक्षांमध्ये बराच वेळ चर्चा आणि वादविवाद सुरू राहिल्याने नियोजित लोखंडी तार कुंपण उभारण्याचे कामही थांबवावे लागले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, उड्डाण पुलाचे काम २०२० मध्ये पूर्ण झाले असून, त्यानंतर संबंधित जागेबाबत कोणतीही अधिकृत तक्रार महानगरपालिकेला प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान उपायुक्त संधू यांच्या निर्देशानुसार उड्डाणपुलाखालील जनावरे हटविण्यात आली होती. त्या ठिकाणी काही संशयास्पद हालचाली व गैरप्रकार घडत असल्याची माहिती मिळाल्याने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी लोखंडी तार कुंपण उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, संबंधित व्यक्ती रेड्डी यांनी विरोध करून काम थांबविल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत पिंपळगाव म. व शेलगाव बु. जिल्हास्तरीय मूल्यमापनाकरिता पात्र

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील पिंपळगाव महादेव व शेलगाव बु. या दोन्ही ग्रामपंचायती मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत पात्र ठरल्या आहेत.

या ग्रामपंचायतींचे मूल्यमापन १ ते २ जून या कालावधीमध्ये होणार असून, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव यांसह १२ अधिकारी भेट देऊन पाहणी करणार असल्याची माहिती पंचायत समितीच्यावतीने देण्यात आली आहे. तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने तालुक्यातील पिंपळगाव महादेव, शेलगाव बु., पार्डी मक्ता, बामणी, बारसगाव, डौर, धामदरी व उमरी या गावांची पाहणी केली होती. यामधून ५ ग्रामपंचायती तालुकास्तरीय मूल्यमापन स्पर्धेत बक्षीसपात्र ठरणार आहेत.

## महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदी राजश्री पाटील यांची बिनविरोध निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नांदेडच्या ज्येष्ठ क्रीडाप्रेमी, यशस्वी खेळाडू आणि संघटक राजश्री पाटील यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे मराठवाड्यासह राज्यातील रिंग टेनिस क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवडणुकीत माजी आमदार मोहन जोशी यांची अध्यक्षपदी तर अनिल वरपे यांची महासचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा यापूर्वी माजी खासदार विजय दर्डा यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. आता ही महत्त्वपूर्ण जबाबदारी राजश्री पाटील यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांच्या नेतृत्वगुणांवर, कार्यक्षमतेवर आणि संघटन कौशल्यावर राज्य संघटनेने दाखविलेला विश्वास अधोरेखित झाला आहे.

राजश्री पाटील या बालवयापासूनच क्रीडा क्षेत्राशी जोडलेल्या असून, त्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर सात राष्ट्रीय पदके मिळवली आहेत. खेळाडू म्हणून यश मिळवतानाच त्यांनी सहकार, शिक्षण, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २००७ मध्ये नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनची स्थापना झाल्यापासून त्या संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली २०१९ आणि २०२५ या वर्षांत राज्यातील सर्वात मोठ्या रिंग टेनिस स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष मान्यता मिळाली आहे.

रिंग टेनिस या खेळाच्या प्रसार व विकासासाठी त्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे राज्यातील रिंग टेनिस चळवळीला अधिक बळ मिळेल आणि संघटनेच्या कार्याला नवी दिशा प्राप्त होईल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

राजश्री पाटील यांच्या निवडीबद्दल नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनचे उपाध्यक्ष टी. एन. रामनबैनवाड, सचिव बालाजी सैनवाड तसेच विविध क्रीडा संघटना, खेळाडू, प्रशिक्षक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या निवडीबद्दल राजश्री पाटील यांनी महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेचे अध्यक्ष मा. आ. मोहन जोशी, महासचिव अनिल वरपे, राज्यातील सर्व पदाधिकारी, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी यांचे आभार मानले.

## तंबाखूमुक्तीसाठी डेंटल कॉलेजतर्फे जनजागृती




**नांदेड (प्रतिनिधी)**– ३१ मे हा दिवस जागतिक तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात तंबाखू खाणे, सिगारेट ओढणे याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. या प्रसंगी जनजागृती व्हावी म्हणून नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वतीने खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी शहरातील वजिराबाद, रेल्वे स्टेशन, आय.टी.आय. या प्रमुख चौकात पथनाट्याच्या माध्यमातून तंबाखू ही शरीरासाठी किती हानिकारक आहे हे दर्शवून दिले.

तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी नांदेड रस्ते डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मागच्या वर्षी भारतातून पहिला नंबर मिळविला होता, आणि यंदाही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. नांदेड वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जसपालसिंग कोटीतीर्थवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## नलिनी देशमुख यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील बजाजनगर येथील ज्येष्ठ महिला श्रीमती नलिनी रमाकांतराव देशमुख कहाळेकर (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने शनिवार, दि. ३० मे रोजी सायंकाळी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. ३१ मे रोजी सकाळी ८.३० वाजता गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात सदाशिव आणि शेखर ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com